# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. पंडीत एन्. शेळके
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/९० /२०१४

दि. १५ जुलै २०१४

प्रति,
मा. प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित महाविद्यालये
पुणे शहर

**विषय : राज्य युवा प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन व युवा परिषद, २०१४ चे आयोजनाबाबत.**

महोदय,

मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून आलेल्या पत्रानुसार आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या युगात नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी युवाच्या सक्षमीकरणाची गरज लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने राज्याचे पहिले युवा धोरण सन २०१२ मध्ये जाहीर केले आहे. युवांचे व्यक्तिमत्व विकास, युवांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, प्रशिक्षण व कौशल्य विकास, स्वयंरोजगार, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संरक्षण, संविधानाप्रती आदर तसेच युवांचे हक्क आणि कर्तव्य यांची जाणीव करून भावी पिढीसमोर आदर्श युवक व युवा नेतृत्व निर्माण करण्यासाठी तसेच युवांच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासनाने शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे–बालेवाडी, पुणे येथे ''राज्य युवा प्रशिक्षण केंद्र'' स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

राज्य युवा प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन व ''युवा परिषद २०१४ चे आयोजन दि. १९ जुलै २०१४ रोजी सकाळी ८.०० ते सायं ६.०० या वेळेत शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे–बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी सदर प्रशिक्षण कार्यशाळेकरीता आपल्या महाविद्यालयातील २५ रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविकांना दि. १९ जुलै २०१४ रोजी सकाळी ८.०० वाजता कार्यक्रमस्थळी पाठवावे ही विनंती. तसेच कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर विद्यार्थी सहभाग यादी, विद्यार्थी प्रतिक्रिया महाविद्यालयामार्फत रासेयो कार्यालयास रासेयो नियोजन बैठकीच्या वेळी सोबत घेवून येणे आवश्यक आहे. (स्वयंसेवकांच्या अल्पोपहार व भोजन व्यवस्था आयोजकामार्फत करण्यात आलेली असून स्वयंसेवकांचा प्रवासखर्च महाविद्यालयाने रासेयो नियमित कार्यक्रमातून करावा ही विनंती.)

सोबत : शासनाचे संबधित सविस्तर परिपत्रक जोडत आहे.

कळावे,

आपला विश्वासू

प्र.कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

संपर्कासाठी : श्री. महादेव कसगावडे, क्रीडा अधिकारी– ९४२२५१८४२२
श्री. सुहास पाटील – जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे ९६८९९३९४३१

क्र.-क्रीयुसे/रायुप्रकें/(१४)/यु.प./२०१४/का-१०
क्रीडा व युवक सेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
दिनांक- 14 JUL 2014

प्रति,

मा. प्रकल्प अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ, पुणे

विषय- राज्य युवा प्रशिक्षण केंद्राचे उदघाटन व युवा परिषद, २०१४ चे आयोजन बाबत

महोदय,

भारत हा युवाचा देश म्हणून ओळखला जातो. युवा हा समाजातील अत्यंत महत्वाचा घटक असून समाजाच्या व देशाच्या विकास प्रक्रीयेत युवांचा सक्रीय सहभाग व युवांचे सक्षमीकरण होणे ही काळाची गरज आहे. युवांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, कौशल्यांचा विकास, श्रमशक्तीचे नियोजन, सामाजिक जाणीवेचे भान असणे आवश्यक आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या युगात नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी युवाच्या सक्षमीकरणाची गरज लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने राज्याचे पहिले स्वतंत्र युवा धोरण सन २०१२ मध्ये जाहीर केले आहे.

सामाजीक निर्णय प्रक्रीया , संघटनात्मक नियोजन व शैक्षणिक सुधारणा हे युवा सक्षमीकरणाचे प्रमुख घटक आहेत. व्यक्तिमत्व विकास, प्रशिक्षण व कौशल्य विकास, स्वयंरोजगार, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संरक्षण, संविधानाप्रती आदर तसेच युवांचे हक्क आणि कर्तव्य यांची जाणीव करुन भावी पिढीसमोर आदर्श युवक व युवा नेतृत्व निर्माण करण्यासाठी तसेच युवांच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासनाने शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे "राज्य युवा प्रशिक्षण केंद्र " स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

राज्य युवा प्रशिक्षण केंद्राच्या उदघाटन समारंभानिमित्त "युवा परिषद २०१४" चे आयोजन दि. १९ जुलै, २०१४ रोजी स. ८.०० ते सा. ६.०० या वेळेत शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे करण्याचे निश्चित केलेले आहे. युवा परिषदेमध्ये "सामाजिक विकासात युवांची भुमिका" "युवकांपुढील आव्हाणे" "राज्याचे युवा धोरण-२०१२" " व्यवसाय मार्गदर्शन" इ. विषयावर चर्चा तसेच तज्ञ व्यक्तिंकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. परिषदेस उपस्थित युवकांच्या भोजनाची व निवासाची व्यवस्था संचालनालयाने केलेली आहे.

सदर परिषदेसाठी पुणे विद्यापीठाशी सलग्न असलेल्या पुणे शहरातील विविध महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रत्येकी २५ युवक युवतींना उपस्थित रहाण्याच्या अनुषंगाने आपल्या विभागामार्फत योग्य कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.

आपला,

(एन. बी. मोटे)
उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

परिशिष्ट ब

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

# राज्य युवा प्रशिक्षण केंद्र उदघाटन व युवा परिषद, २०१४

*कार्यक्रम पत्रिका*

शनिवार दि. १९ जुलै, २०१४

| | |
|---|---|
| स. ८.०० पर्यंत | युवक उपस्थिती |
| स. ८.०० ते ९.०० | युवकांची उपस्थिती व नोंदणी |
| स. ९.०० ते १०.०० | चहापान नाश्ता |
| स. १०.०० | राज्य युवा प्रशिक्षण केंद्राचे उदघाटन |
| स.१०.०० ते दु. ११.३० | युवा परिषद उदघाटन समारंभ |
| स. ११.३० ते दु. १२.३० | युवा धोरणाबाबत चर्चा |
| दु. १२.३० ते दु. १.३० | युवकांपुढील आव्हाणे |
| दु. १.३० ते दु. २.३० | दुपारचे भोजन |
| दु. २.३० ते सा. ३.३० | युवकांशी संवाद |
| सा. ३.३० ते सा. ४.३० | सामाजिक विकासात युवकांचे योगदान |
| सा. ४.३० ते सा. ४.४५ | चहापान |
| सा. ४.४५ ते सा. ६.३० | करीयर गायडन्स |
| सा. ६.३० ते सा. ७.३० | युवा परिषद समारोप समारंभ |
| रा. ७.३० ते रा. ९.०० | रात्रीचे भोजन |


अधिक माहितीसाठी संपर्क

१) श्री एन. बी. मोटे, उपसंचालक :- ९८६९०५५३५६
२) श्री जनक टेकाळे, उपसंचालकः- ९८२२०९९२०१
३) श्री सुधिर मोरे, सहाय्यक संचालकः- ९९७००६९२५५
४) श्री सुहास पाटील, जि.क्री.अ., पुणे:- ९६८९९३१४३१
५) श्री महादेव कसगावडे, क्रीडा अधिकारीः- ९४२२५१८४२२

E Mail:- dsys_pun@yahoo.co.in